# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## प्रकरण कं. ग्रागानिमं/नाशप/०४८ /२०१०

अर्जदार : श्री किरण पुरूषोत्तम चौधरी
राहणार माहुली रोड, मनसर,
तहसिल रामटेक,
जिल्हा नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
विभाग कंमाक १, नाशप,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती : 1) श्रीमती मीरा खडक्कार
सभापती,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्रीमती के.के घरत
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

3) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

–– आदेश ––

पारीत दि. ०२.०८.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक ३०.०६.२०१० रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम ६.४ विनियम २००६ प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील :–

१. श्री किरण पुरूषोत्तम चौधरी, राहणार मनसर, तालुका रामटेक यांनी दिनांक ०३.०४.२०१० रोजी अंतर्गत ग्राहक तक्रार कक्ष, नागपूर ग्रामीण मंडळ येथ तक्रार केली होती. तसेच दोन वर्षापासून घरगुती वापराकरीता विज जोडणीचे नियमीत विद्युत देयके भरून सुध्दा माहे मार्च २०१० मध्ये गैरअर्जदारातर्फे पाठविण्यात आलेले १७,५०० रकमेचे देयका बाबत तक्रार दाखल केली होती. परंतु कक्षातर्फे कुठलेही उत्तर न मिळाल्याने अर्जदाराने दिनांक 30.06.2010 रोजी मंचात गा–हाणे दाखल केले व मंचाला विनंती केली की

   अ) सदर विद्युत देयकाची रक्कम अर्जदाराच्या अवाक्याबाहेरची असल्यामुळे तो देयक भरण्यास असमर्थ आहे, तेव्हा सदर विद्युत देयक माफ करण्यात यावे.

   ब) गैरअर्जदारातर्फे नियमीतपणे दरमहा मीटर वाचनानुसार विद्युत देयक देण्यात यावे.

२. अर्जदाराने मंचात सादर केलेल्या अर्जात असे म्हटले आहे की तो एक घरगुती विज ग्राहक असुन, त्याचा ग्राहक कं. ४२२०४०९९८२५१ आहे. तसेच विज जोडणी झालेल्या तारखेपासून तो नियमीत विद्युत देयके भरणा करीत आहे. परंतु मार्च २०१० मध्ये त्याला रू. १७,५०० रक्कम असलेले विद्युत देयक पाठविण्यात आले, जे त्याला मान्य नाही.

   अर्जदाराने पुढे असे नमुद केले की तो शेतात राहतो व तिथे सिंगल फेज पुरवठा नाही. तसेच त्याजागी बारा तासांचे भारनियमन असते, वाहीनीमध्ये

वेळोवेळी बिघाड होत असल्यामुळे विद्युत पुरवठा कमी प्रमाणात उपलब्ध असतो व त्याचा विज वापर सुध्दा कमी आहे. पुढे त्यांनी असेही नमुद केले आहे की त्यांनी तक्रार केल्यानंतर सुध्दा गैरअर्जदाराने मीटरचे वाचन न घेता अंदाजे विद्युत देयक पाठविले आहे. तेव्हा सदर तक्रारीची नोंद घेवून, योग्य न्याय देण्याबाबत अर्जदाराने मंचाला विनंती केली आहे.

३. गैरअर्जदाराने दिनांक १४.०७.२०१० रोजी दाखल केलेल्या उत्तरात हे मान्य केलेले आहे की दिनांक २३.१२.२००६ पासुन फेब्रुवारी २०१० पर्यंत अर्जदारास 'आर.एन.ए.' शेरा असलेले विद्युत देयक पाठविण्यात आली आहेत, परंतु फेब्रुवारी २०१० मध्ये अर्जदाराला मीटरच्या वाचनानुसार २६ महीन्याचे रू. १७,२५० रकमेचा विद्युत देयक देण्यात आले त्यामध्ये सरासरी युनिटचे रू. २९५८.६९ इतका क्रेडीट देण्यांत आला आहे. तसेच संबंधीत अर्जदारास वाढीव बिलाबाबत संपुर्ण माहिती देण्यात आली आहे. मीटरच्या वाचनानुसार विद्युत देयक पाठविण्यात आलेले आहेत, तेव्हा सदर तक्रार रद्द करण्याबाबत गैरअर्जदाराने आपल्या स्पष्टीकरण पत्रात मंचाला विनंती केली आहे.

४. दिनांक १७.०७.२०१० मंचात सुनावणी घेण्यांत आली गैरअर्जदारातर्फे श्री एस. आर. सराटे, सहाय्यक अभियंता रामटेक, हे उपस्थित होते. श्री किरण चौधरी, अर्जदार यांनी आपली बाजु मांडतांना सांगितले कि ते नियमीत विद्युत देयक भरणा करीत आहे. तसेच फेब्रुवारी 2010 पर्यंत मीटरचे वाचन न करता सरासरी वापर असलेले विद्युत देयक त्यांना पाठविण्यात आले. तक्रार करून सुध्दा त्यांच्या मीटरचे वाचन घेण्यांत आले नाही. तसेच मागील दोन महिन्यापासुन 'कुलूप बंद' शेरे असलेले विद्युत देयक पाठविले आहे. तरी गैरअर्जदारातर्फे नियमीतपणे मीटर वाचनाचे विद्युत देयक मिळण्याबाबत अर्जदाराने मंचाला विनंती केली आहे.

५. गैरअर्जदाराने मंचासमोर आपले स्पष्टीकरण दिले कि अर्जदाराचे घर शेतात असल्यामुळे व मीटर वाचन करणारे कंत्राटदार वांरवार बदलत असल्यामुळे, त्यांच्या मीटरचे वाचन झाले नाही. परंतु फेब्रुवारी 2010 मध्ये असलेले मीटर वाचना अनुसार अर्जदारास विद्युत देयक पाठविण्यात आले आहे. तसेच अर्जदारास पाठविण्यात आलेल्या विद्युत देयकाचा भरणा करण्याकरीता हप्त्यांची सवलत अर्जदारास मागणीनुसार देण्यात येईल.

६. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकल्यानंतर व मंचात सादर केलेल्या पत्रावरून मंचाचे असे मत आहे की अर्जदाराला २६.१२.२००६ पासुन ते फेब्रुवारी २०१० पर्यंत म्हणजे एकुण २६ महिने मीटर वाचनाचे विद्युत देयक न पाठविता सरासरी वापराचे अंदाजित देयक गैरअर्जदारातर्फे पाठविण्यात आले, जे अर्जदाराने नियमीतपणे भरले आहेत. अशा परिस्थितीत विद्युत कायदा २००३ कलम ५६ २) अन्वये ––
"No sum due from any consumer, under this section shall be recoverable after the period of two years from the date when such sum became first due unless such sum has been shown continuously as recoverable as arrear of charges for electricity supplied and the licensee shall not cut off the supply of the electricity".

याचा अर्थ असा की गैरअर्जदार हा फेब्रुवारी २०१० पासुन ते मागिल फक्त २४ महिन्यापर्यंत विद्युत देयक अर्जदारास सादर करू शकतो व उर्वरीत दोन महिन्याचे देयक गैरअर्जदारास घेता येणार नाही. परंतु सदर देयक तयार करतांना 'स्लेब बेनिफीट' व इतर तरतुदीचा लाभ मिळण्यास अर्जदार पात्र ठरतो.

तेव्हा अर्जदाराची विद्युत देयक पुर्णपणे माफ करण्याची प्रार्थना मान्य करता येणार नाही.

७. सदर गा–हाण्याची सुनावणी होत असतांना एक अत्यंत गंभीर बाब
हया मंचाच्या निदर्शनास आलेली आहे की गैरअर्जदारातर्फे अर्जदाराच्या मीटरचे वाचन सलग २६ महिने घेण्यात आले नाही. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम, २००५ च्या कलम

**<u>१४.३ मीटरच्या नोंदी घेणे अनुसार</u>** ––

"एखाद्या ग्राहकाकरीता किंवा ग्राहकाच्या वर्गाकरीता आयोगाने विशिष्ट मंजुरी दिली नसेल तर मीटरच्या नोंदी घेण्याचे काम अधिकृत प्रतिनिधीकडुन कृषी ग्राहकांच्या बाबतीत किमान तीन महिन्यातून किमान एकदा आणि इतर ग्राहकांच्या बाबतीत किमान दोन महिन्यांतून एकदा करण्यात येईल".

तेव्हा गैरअर्जदाराने वरील विनियमाचे पालन न केल्याचे सिध्द होते. त्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २००५ कलम १२ परिशिष्ट 'अ' अनुक्रमाक ७(१) अनुसार अर्जदाराला एकुण २५ महीने मीटरचे वाचन न केल्यामुळे, पहिल्या महीन्याकरीता १०० रूपये व त्यांनतरच्या २४ महीन्याकरीता २०० रूपये प्रमाणे भरपाई मिळण्यास अर्जदार पात्र ठरतो.

अर्जदाराने तक्रार केल्यानंतर सुध्दा विज मीटर नोंदी, याची गैरअर्जदाराने दखल घेवून भविष्यात अशा घटनांची पूनरावृत्ती होवू नये या करीता संबंधीतांना निर्देश दयावे.

दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकुन सादर केलेल्या कागदपत्राचा विचार करून खालील आदेश देण्यात येत आहे.

# आदेश

१. गैरअर्जदाराने अर्जदारास फेब्रुवारी २०१० मध्ये दिलेल्या विद्युत देयकापैकी सुरवातीच्या दोन महीन्याचे बिल रद्द करावे व उर्वरीत २४ महिन्याचे विद्युत देयक योग्य ती सवलत देवुन अर्जदारास देण्यात यावे.

२. गैरअर्जदाराने अर्जदारास मीटर नोंदी न घेतल्याबददल कृती मानकाप्रमाणे पहिल्या देयकास १०० रूपये व त्यानंतरचे उर्वरीत २४ महिन्याकरीता प्रती महिना २०० रूपये भरपाई द्यावी.

३. गैरअर्जदारास आदेश देण्यात येते की आदेशाची प्रत मिळाल्यापासुन एक महीन्याचे आत कार्यवाहीबददलचा अहवाल हया कार्यालयात पाठविण्यात यावा.

| सही/– | सही/– | सही/– |
|---|---|---|
| (श्रीमती के.के. घरत) | (श्रीमती गौरी चांद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या् | सभापती |

सदस्य–सचिव
(कार्यकारी अभियंता)
ग्राहक गा–हाणे निवारण मंच (ना.श.प.)
म.रा विद्युत वितरण कंपनी मर्या.
नागपूर